सुविदे फाउंडेशन

# कृषी विज्ञान केंद्र,वाशिम

करडा ता.रिसोड जि.वाशिम

## ई-त्रैमासीक बातमीपत्र



## शास्त्रीय सल्लागार समितीची आढावा सभा संपन्न



भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली पुरस्कृत कृषी विज्ञान केंद्राद्वारे संपुर्ण वर्षभर शेतकऱ्यांच्या गरजेवर आधारीत व कौशल्यभिमुख शेतकरी प्रशिक्षण, आघरेशा पिक प्रात्यक्षिक, उदयमशिलता व कृषि विस्तार या राबविलेल्या उपक्रमांचा आढावा व सुचना देण्याकरीता शास्त्रीय सल्लागार समितीची सभा घेण्यात येते. चालु वर्षाची कृषि विज्ञान केंद्र वाशिम शास्त्रीय सल्लागार समितीची सभा गुरुवार दिनांक १९ डिसेंबर २०२४ रोजी सुविदे फाउंडेशनचे विश्वस्त संजय उकळकर यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विदयापीठ अकोला अंतर्गत कृषि संशोधन केंद्र, वाशिमचे प्रभारी अधिकारी डॉ.बी.डी.गिते, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी अरीफ शहा, आत्माच्या प्रकल्प संचालक अनिसा महाबळे, जिल्हा रेशिम विकास अधिकारी एस.पी.फडके, जिल्हा व्यवस्थापक माविम राजेश नागापुरे, उपआयुक्त मत्स्य विभाग प्रियंका झोड, लिड बँक मॅनेजर यशविर कुमार, उमेद प्रकल्पाचे आर.के.खानझोडे, स्वरानंत केद्राचे संदिप देशमुख व प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.आर.एल.काळे यांच्या उपस्थीतीत संपन्न झाली. कृषि परीषदेच्या स्वागत गितानंतर प्रास्ताविकात डॉ.आर.एल.काळे यांनी एकात्मीक शेती पदधती मॉडेल, स्वयं रोजगार, कृषि विज्ञान केंद्रांना मॅनडेट सोबत राष्ट्रीय स्तरावरील प्राधान्य क्रमाच्या उपक्रमांची अमलबजावणी करावी लागते. कोरडवाहु अल्पभुधारक शेतकऱ्यांना शिफारशीत तंत्रज्ञान अनुकरण करुन शेतीतील खर्चात कपात व अधिक नफा घ्यावा तसेच शेतीपुरक व्यवसायाला चालना दयावी या हेतुने कृषि विज्ञान केंद्राचे चमु सतत कार्यरत आहे असे प्रतिपादन केले. अध्यक्षस्थानावरुन संबोधतांना विश्वस्त संजय उकळकर यांनी पारंपारीक पिक पदधतीसोबत शेतकऱ्यांनी आधुनिक पदधतीची व अधिक नफा देणारी शेती पदधतीच्या तयारीला लागावे असे सुचविले.सभेच्या तांत्रिक सत्रात कृषि विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ डॉ.आर.एल.काळे, टि.एस.देशमुख, एन.बी.पाटिल, आर.एस.डवरे, डॉ.एस.के.देशमुख, मयुर देशमुख, शुभांगी वाटाणे, एस.आर.बावस्कर, व प्रमोद देशमुख यांनी विभाग निहाय राबविलेल्या कार्यक्रमांचा प्रगती अहवाल व प्रस्तावित कृति आराखडा सादर करुन सभेतील सदस्यांनी दिलेल्या सुचनांची नोंदी घेतल्या. प्रक्षेत्रभेटी मध्ये प्रामुख्याने कृषि निविष्ठा उत्पादन केंद्र, एकात्मिक शेती पदधती युनिटची प्रत्यक्ष पाहणी केली.या सभेला जिल्हयातील प्रयोगशिल शेतकरी सुचिता देशमुख, अंजना हांडे, प्रदिप देशमुख, गजानन खोडके, गजानन बाजड, सुकनंदन हांडे, तेजराव कांबळे व विलासराव बोरकर उपस्थीत होते.

## ॲग्रोटेक कृषि प्रदर्शनीत वाशिम कृषि विज्ञान केंद्राचे दालन



डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त दिनांक २७ ते २९ डिसेंबर २०२४ दरम्यान ॲग्रोटेक या राज्यस्तरीय कृषि प्रदर्शनाचे आयोजन अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाच्या क्रीडांगण परिसरात करण्यात आले होते. या भव्यदिव्य प्रदर्शनात वाशिम जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करताना कृषि विज्ञान केंद्र करडा यांचे आकर्षक आणि माहितीपूर्ण दालन मांडण्यात आले होते. कृषि विज्ञान केंद्राच्या दालनात नवनवीन तंत्रज्ञान, विषमुक्त शेतीचे मॉडेल, उन्नत पीक वाणांवर आधारित तांत्रिक शेती, ॲझोला उत्पादन, कुक्कुटपालनासाठी सोनाली जातीचे पक्षी आणि बटेरपालन, एकात्मिक शेती पद्धती, शेतीपूरक व्यवसायांसाठी संसाधनावर आधारित तंत्रज्ञान, शोभिवंत माशांचे ॲक्वेरियम, सेंद्रिय शेती, गांडुळखत उत्पादन, महिलांचे श्रम कमी करणारी औजारे व यंत्रे, तसेच सेंद्रिय पद्धतीने उत्पादित विविध निविष्ठा यांचा समावेश होता. शेतकऱ्यांसाठी कृषि विज्ञान केंद्राने प्रकाशित केलेली पुस्तकं आणि माहितीपर साहित्यही या दालनात उपलब्ध करून देण्यात आले. तसेच, कृषि विज्ञान केंद्राच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली कार्यरत बचत गटांनी तयार केलेल्या विविध उत्पादनांचे दालनही प्रदर्शनात मांडण्यात आले होते, ज्यामुळे शेतकरी आणि ग्रामीण महिलांना रोजगाराची नवी दालने उघडली गेली. या दालनास खासदार श्री. अनुप धोत्रे, कुलगुरू डॉ. शरद गडाख, संचालक विस्तार शिक्षण डॉ. डी.बी. उंदीरवाडे, डॉ. नितीन कोष्टी, रेशीम संचालनालयाचे संचालक डॉ. महेंद्र ढवळे यांसारख्या मान्यवरांनी भेट दिली आणि कौतुक केले. कृषि प्रदर्शनादरम्यान वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि प्रमुख डॉ. आर.एल. काळे, शास्त्रज्ञ डॉ. एस.के. देशमुख, डॉ. डी.एन. इंगोले, आर.एस. डवरे, एन.बी. पाटील, टी.एस. देशमुख, शुभांगी वाटाणे, मयूर देशमुख, प्रमोद देशमुख, आर.व्ही. कोठाळे आणि प्रकल्पातील कर्मचारी राम देशमुख, दत्ता काळे, अर्चना कदम, प्रविण जाधव यांनी सक्रिय सहभाग नोंदवून शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन केले. या प्रदर्शनामुळे शेतकरी बांधवांना अत्याधुनिक तंत्रज्ञान, शेतीपूरक व्यवसायांचे नव्या संधी, आणि शाश्वत शेतीसाठी नवनवीन उपाय योजनांची माहिती मिळाली, ज्याचा त्यांना निश्चितपणे लाभ होईल.

## किसान सन्मान सम्मेलन व कृषि चर्चासत्राचे आयोजन

मा.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या शुभहस्ते आज केंद्र सरकारच्या किसान सन्मान निधीचा १८ वा हप्ता ९.४ कोटी शेतकऱ्यांना वितरीत करणार, नमो शेतकरी महासम्मान निधी योजनेचा ५ वा हप्ता वितरीत करणार, पंतप्रधान कृषि पायाभुत सुविधा निधी अंतर्गत रु.१९२० कोटी जास्त किमतीचे प्रकल्प देशाला समर्पित, ९२०० शेतकरी उत्पादत संघटना राष्ट्राला समर्पित, रुपये २३३०० कोटींच्या कृषि आणि पशुपालन क्षेत्रातील विविध उपक्रमांचा शुभारंभ तसेच लाडकी बहिन योजनेचा निधी पोहरादेवी ता.मानोरा जि.वाशिम येथुन दिनांक ५ ऑक्टोंबर २०२४ रोजी करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरवातीला बंजारा विरासत संग्राहालयाचे उदघाटन व या संपुर्ण कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपन दुरदृष्य प्रणाली व्दारे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. रवींद्र काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कृषि विज्ञान केंद्र वाशिमच्या प्रक्षेत्रावर करण्यात आले. याप्रसंगी मा.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, महाराष्ट्राचे राज्यपाल सि.पी.राधाकृष्णण, मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजितदादा पवार, केंद्रिय कृषि मंत्री शिवराजसिंह चौहान, पशुपालन व दुग्ध विकास मंत्री राजिव रंजन शुक्ला, पालकमंत्री संजय राठोड आदी मान्यवर उपस्थीत होते. याप्रसंगी संबोधतांना मा.पंतप्रधान यांनी बंजारा समाजाची काशीला पर्यटकांनी भेट दयावी असे आव्हान केले. विकसीत भारताचे स्वप्न पुर्तीसाठी देश स्तरावर सुरु असलेल्या विविध लोकभिमुख योजनांची माहिती देवुन शेतक-यांना सोयाबीन विक्रीतुन अधिक भाव तसेच आधारभुत किंमत व रासायनिक खतांची सबसिडी विषयी सुदधा उदबोधन केले. कर्यक्रमादरम्यान कृषि विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ डा.एस.के.देशमुख, टि.एस.देशमुख, शुभांगी वाटाणे व प्रमोद देशमुख यांनी रब्बी पिक व्यवस्थापन तसेच तुर पिकावरील एकात्मीक किड व्यवस्थापन पदधती या विषयी मार्गदर्शन करुन शेतकऱ्यांच्या प्रश्नांची उत्तरे सुदधा दिली. कार्यक्रमास शेतकरी, महिला भगिनी व कृषि विज्ञान केंद्र सल्गनित प्रकल्पातील कर्मचारी मोठया संख्येने उपस्थीत होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार संगणक तज्ञ एस.आर.बावस्कर यांनी मानले.

## करडी पिक व्यवस्थापन विषयावर चर्चासत्र

राष्ट्रीय खाद्यतेलांच्या आत्मनिर्भरतेला चालना देण्यासाठी प्रगत तेलबिया शेतीतंत्रज्ञानाचा वापर गरजेचा:- मा. चैतन्यभैया देशमुख. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ आणि कृषी विज्ञान केंद्र वाशिम यांनी वाशिम जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील राजुरा गावात ११ ऑक्टोबर २०२४ रोजी एक गांव एक वान कार्यक्रमांतर्गत (रब्बी २०२४) करडी पीक (पीडीकेव्ही पिंक) व्यवस्थापन आणि प्रात्यक्षिक निविष्ठा वितरण कार्यक्रमाचे आयोजित केले होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून विश्वस्त सुविदे फाउंडेशन, कृषी विज्ञान केंद्र वाशिम श्री. चैतन्य देशमुख उपस्थित होते. प्रमुख डॉ. रवींद्र काळे, राजुरा ग्रामपंचायतीचे सरपंच श्री. अजितराव राजुरकर, मालेगाव पंचायत समितीचे माजी सदस्य श्री. इंद्रजीत राजुरकर, तसेच तुषार देशमुख (तेलबिया तज्ज्ञ) आणि कृषी अर्थशास्त्रज्ञ डॉ. डी. एन. इंगोले उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात पाहुण्यांच्या स्वागताने झाली. तुषार देशमुख यांनी आपल्या परिचियात्मक भाषणात तेलबियांच्या पिकांद्वारे स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी करडी पीक उत्पादनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कसे उत्पादन वाढवता येईल याची माहिती दिली. डॉ. रवींद्र काळे यांनी कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध उपक्रमांबद्दल माहिती देऊन, शेतकऱ्यांनी प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब करून तेल व खत उत्पादनात स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे असे आवाहन केले. कृषी अर्थशास्त्रज्ञ डॉ. डी. एन. इंगोले यांनी करडी पिकाच्या उत्पादनाचे आरोग्यदायी फायदे व मूल्यवर्धित प्रक्रिया उद्योगांच्या संधींबद्दल मार्गदर्शन केले. सरपंच श्री. अजितराव राजुरकर यांनी राजुरा गावात अशा कार्यक्रमांचे आयोजन करून शेतक-यांना तेलबिया उत्पादनात स्वयंपूर्ण बनवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले. त्यांनी पीडीकेव्ही अकोला आणि के. व्ही. के. वाशिमच्या तज्ज्ञांच्या कामगिरीचेही अभिनंदन केले. श्री. चैतन्य देशमुख यांनी आपल्या भाषणात कृषी विज्ञान केंद्राच्या महत्त्वावर भर दिला आणि प्रगत तंत्रज्ञान, सुधारित पीक उत्पादकता आणि प्रक्रिया तंत्रांच्या वापराद्वारे ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास कसा होईल याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान मान्यवरांच्या हस्ते करडी पीडीकेव्ही गुलाबी प्रात्यक्षिक किटचे वाटप शेतक-यांना करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी तेलबिया तंत्रज्ञानाचे प्रतिनिधी अविनाश गवळी, पिराजी जाधव आणि शिवाजी वाघ यांनी विशेष परिश्रम घेतले.

## वापटी येथे कपाशी शेतीदिन अतिघनता तंत्राचे अनुभव कथन

कृषी विज्ञान केंद्र वाशिम व केंद्रीय कापूस संशोधन संस्था नागपूर द्वारे विशेष कापूस प्रकल्प अंतर्गत कापुसपीक शेतीदिनाचे आयोजन कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर. एल. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१२ डिसेंबर २०२४ रोजी मौजे वापटी तालुका कारंजा जिल्हा वाशिम येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. राकेशकुमार गोस्वामी जैवतंत्रज्ञानशास्त्रज्ञ केंद्रीय कापूस संशोधन केंद्र नागपूर व कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून डॉ.सुधीर देशमुख कृषीविस्तार शास्त्रज्ञ , अश्विनी भोसले तालुका कृषी अधिकारी कारंजा श्री रवींद्र जटाळे मंडळ श्री अतुल क्षीरसागर , स्वाती वानखेडे कृषी सहाय्यक वापटी, श्री अशोक टाके सरपंच वापटी, सुनिता आसाराम मोहिते उपसरपंच वापटी हे उपस्थित होते. तसेच मार्गदर्शक म्हणून श्री तुषार देशमुख कृषीतज्ञ व समीर चौरे प्रक्षेत्र अधिकारी राशी सीड्स इत्यादी मान्यवर उपस्थित होते. प्रस्ताविकेत टी एस देशमुख यांनी शेतकऱ्यांना सघन कापूस पीक लागवड तंत्रज्ञान सुलभ सुधारित वाण प्रकल्पाचे उद्देश व फायदे सांगितले. अध्यक्ष राकेश कुमार गोस्वामी यांनी केंद्रीय कापूस संशोधन केंद्र या अंतर्गत कापूस पीक अति घनता तंत्रज्ञान याबद्दल माहिती दिली तसेच शेतकऱ्याचे वाढते उत्पादन हा ग्रामीण विकासाचा महत्त्वाचा घटक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



डॉ. सुधीर देशमुख यांनी शेतकऱ्यांना नवे तंत्रज्ञानाचा अवलंब करून कापसाचे उत्पादन वाढविण्याचे आवाहन केले. श्री रवींद्र जटाळे यांनी शेतकऱ्यांना आधुनिक कृषीतंत्र वापरून कमी खर्चाची पर्यायी तंत्रशेतीसाठी प्रेरित करावे असे सांगितले.श्री अशोक टाके यांनी कापूस पीक प्रकल्प बद्दल समाधान व्यक्त केले. कार्यक्रमानंतर प्रकल्पातील प्रात्यक्षिक धारक शेतकरी रितेश पाडर यांच्या शेतामध्ये मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये कापूस पीक पाहणी दरम्यान शेतकऱ्यांनी त्यांच्या शेती समस्या आधारित समाधान तज्ञांकडून घेतले.

## कृषी विज्ञान केंद्र वाशिम व्दारे राष्ट्रीय महीला शेतकरी दिवस संपन्न

आजच्या समाजात स्त्री आणि पुरुष दोघेही अर्थव्यवस्थेला पुढे नेण्यासाठी अथक परिश्रम करत आहेत.अलीकडच्या काळात कृषी, उत्पादन, औद्योगिक क्षेत्र, सेवा क्षेत्र आणि इतर अनेक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांची संख्याही वाढली आहे. कृषी आणि त्याच्याशी संबंधित क्षेत्रातील महिला शेतकऱ्यांचे कठोर परिश्रम आणि योगदान ओळखण्यासाठी, आपला देश दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी 'राष्ट्रीय महिला किसान दिवस' साजरा करतो. हेच औचित्य साधुन वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर एल काळे कृषी विज्ञान केंद्र वाशिम यांचे मार्गदर्शनाखाली दिनांक १५ ऑक्टोंबर २०२४ रोजी मौजे वाडी येथे राष्ट्रीय महीला शेतकरी दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास कृषी विज्ञान केंद्राचे विस्तार शाखेचे प्रमुख डॉ एस के देशमुख,गृह विज्ञान शाखेच्या शुभांगी वाटाणे व गावातील ज्येष्ठ नागरिक पांडुरंग मारुती गरकळ हे उपस्थित होते तांत्रिक सत्रात डॉ. एस के देशमुख यांनी महिला शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या भूमिकेवर भर दिला, स्त्रिया या 'समाजाच्या खऱ्या शिल्पकार' आहेत आणि कृषी क्षेत्रात त्यांचे योगदान अपरिहार्य आहे हे नमूद केले. त्यांनी निदर्शनास आणून दिले की भारतातील एकूण कृषी कामगार शक्तीपैकी ३३% महिलांचा समावेश आहे आणि पुरुषांच्या वाढत्या ग्रामीण ते शहरी स्थलांतरामुळे, स्त्रिया शेतकरी आणि उद्योजक म्हणून अधिक प्रमुख बनल्या आहेत. त्यांचा वाढता सहभाग असूनही, तथापि, महिलांचे योगदान अनेकदा अपरिचित राहतात म्हणूनच महिलांनी कृषी विज्ञान केंद्राच्या संपर्कात राहून शेतीमधील नवनवीन तंत्रज्ञान अवगत करावे व आपले अस्तित्व निर्माण करावे असे आवाहन केले शुभांगी वाटाणे यांनी महिला हा भारतीय शेतीचा कणा असल्याचा पुनरुच्चार केला . महिलांचे पारंपारिक ज्ञान केवळ उत्पादकता वाढवत नाही तर जैवविविधतेलाही चालना देते याकडे लक्ष वेधून त्यांनी डेअरी फार्मिंग आणि अन्न सुरक्षेतील त्यांच्या महत्त्वपूर्ण भूमिकांवर प्रकाश टाकला. सोबतच शेतकरी महिलांनी कौशल्यावर आधारित शेती सोबतच शेती पूरक व्यवसाय केल्यास त्यांचे सक्षमीकरण होईल असे मत व्यक्त केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ अर्चना कदम यांनी केले तर आभार प्रदर्शन गंगाधर काळे यांनी केले.

## कृषी विज्ञान केंद्र वाशिम व्दारे मासिक शिवार फेरी व चर्चासत्र

भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली पुरस्कृत कृषी विज्ञान केंद्र द्वारे उद्यानविद्या शाखेंतर्गत दत्तक गाव वडजी, तालुका रिसोड जिल्हा वाशिम येथे संत्रा व हळद या पिकावरील गट शेती उपक्रमांतर्गत मासिक चर्चासत्र व शीवार फेरीचे आयोजन आज दिनांक २६ डिसेंबर २०२४ रोजी करण्यात आले होते. सदर कार्यक्रमास श्री विलास बोरकर, प्रगतिशील संत्रा उत्पादक शेतकरी हे अध्यक्षस्थानी होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री निवृत्ती पाटील, उद्यान विद्या तज्ञ, केव्हींके करडा यांची उपस्थिती होती. पहिल्या सत्रात शिवार फेरीमध्ये डॉ. सुनील बोरकर यांच्या गोकृपा अमृत आधारित नैसर्गिक शेती पद्धती अंतर्गत विकसित केलेली संत्रा बागेची तज्ञांनी व उपस्थित सर्व शेतकऱ्यांनी पाहणी करून फळांची आणि पानांची तसेच संपूर्ण बागेची गुणवत्ता बघून समाधान व्यक्त केले व या प्लॉटमधील नियोजनाचे बारकावे समजून घेतले. तदनंतर नाना बोरकर, शिवाजी बोरकर, राजेश बोरकर , अंकुश बोरकर व गोपाल बोरकर यांच्या संत्रा बागांची पाहणी करून पुढील उपाय योजना बद्दल तज्ञांनी मार्गदर्शन केले. या सोबतच राजेश बोरकर यांच्या शंभर टक्के गोकृपा अमृत नैसर्गिक शेती पद्धतीद्वारे



## कृषि विज्ञान केंद्र वाशिमच्या वतीने जागतिक अन्न दिवस साजरा



संपुर्ण जगभर १६ ऑक्टोंबर हा दिवस जागतिक अन्न दिवस म्हणुन साजरा केला जातो याच अनुषंगाने भारतीय कृषि अनुसंधान परीषद नवी दिल्ली पुरस्कृत कृषि विज्ञान केंद्र, वाशिम वतीने कृषि विज्ञान केंद्र करडा प्रक्षेत्रावर जागतिक अन्न दिवस कार्यक्रम कृषि विज्ञान केंद्रातील प्रमुख डॉ.एस.के.देशमुख तसेच शास्त्रज्ञ आर.एस.डवरे, टि.एस.देशमुख, मयुर देशमुख व शुभांगी वाटाने यांच्या प्रमुख उपस्थीतीत संपन्न झाला. यावर्षीचे घोष वाक्य सुखी जिवन व उज्वल भविष्यासाठी सर्वांना अन्नाचा अधिकारच्या संकल्पनेनुरुप एक दिवसीय कार्यशाळा व जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी संबोधतांना डॉ.एस.के.देशमुख यांनी जागतिक अन्न दिवस साजरा करण्याचे महत्व व त्यानुरुप शेती मधिल बदलते अव्हाने व पुढिल संधी विषयी उपस्थीतीतांना जागृत करुन कमी खर्चाची शेती व ग्रामिण महिलांनी कृषि पुरक व्यवसायाची कास धरुन आर्थिक संपन्नता साधावी असे मत मांडले. आर.एस.डवरे यांनी जागतिक अन्न दिवसाला पोष्कि अन्न पदधती समर्पित असुन या करीता भरड धान्याचे दैनंदिन आहारात वापर वाढवावा तसेच अन्न सरक्षण करीता एकत्रित प्रयत्न करावे असे सांगितले. टि.एस.देशमुख यांनी रब्बी पिकांचे लागवड तंत्र तर मयुर देशमुख यांनी शेतीपुरक व्यवसायांची माहिती दिली. गृह विज्ञान विभागाच्या प्रमुख शुभांगी वाटाने यांनी राष्ट्रीय महिला किसान दिवस व जागतिक अन्न दिवस या दोन्ही महत्वाच्या दिवस साजरे करण्यात ग्रामिण महिलांचे शेतीमधिल योगदान अधोरेखित केले. कृषि व अन्न प्रक्रिया व्यवसायातील संधी व पोषक आहारासाठी सोया, दाळ प्रक्रिया उदयोग व घरगुती स्तरावर उभारता येणारे मसाले व पापड उदयोगचे अर्थशास्त्रीय मांडणी करुन प्रधानमंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया योजनेची माहिती देवुन योजनेचा लाभ घेण्याचे आव्हान केले. कार्यक्रमादरम्यान पोष्कि तृणधान्यांपासुन तयार केलेल्या अन्न पदार्थांची पाक कृती स्पर्धा घेण्यात आली व स्पर्धेत भागुबाई गरकळ, वर्षा गरकळ व सिमा गरकळ अनुक्रमे बक्षिस विजेत्या ठरल्या. कार्यक्रमास महिला, शेतकरी बांधव, युवक, बचत गट तसेच कृषि विज्ञान केंद्राच्या प्रकल्पातील कर्मचारी यांची बहुसंख्येने उपस्थिती लाभली.

विकसित केलेल्या हळद प्लॉटची सुद्धा सर्वांच्या वतीने पाहणी करण्यात आली व राजेश बोरकर यांनी लागवडी पासून ते आतापर्यंतचे संपूर्ण नियोजन व केलेल्या उपाययोजनाबद्दल उपस्थित सर्व शेतकऱ्यांना माहिती दिली. तांत्रिक सत्रात निवृत्ती पाटील यांनी नैसर्गिक शेतीचे महत्व, पिकांची अन्न निर्मितीची प्रक्रिया व यामध्ये सेंद्रिय कर्ब व जिवाणू यांची महत्त्वाची भूमिका याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले तसेच किडी व रोग या संदर्भात देखील उपस्थित शेतकऱ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले आणि संत्रा सारखी पिके सुद्धा गोकृपा अमृत आधारित नैसर्गिक शेती पद्धती द्वारे उत्कृष्टरित्या, कीड व रोग मुक्त उत्पादन घेणे सहज शक्य असल्याचे सांगितले. सदर कार्यक्रमास वाशिम व बुलढाणा जिल्ह्यातील हळद व संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी उपस्थिती लावून कार्यक्रमाचा लाभ घेतला.

## रब्बी जवस:हरभरा आंतरपीकातून आरोग्यदायी खाद्य तेलबिया पिकाचे शाश्वत उत्पादन घ्यावे :- डॉ. बिना नायर.



डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला, स्थापना दिन दिनांक २० ऑक्टोबर २०२४ रोजी अखिल भारतीय जवस मोहरी संशोधन केंद्र प्रकल्प कृषी महाविद्यालय नागपूर व कृषी विज्ञान केंद्र वाशिम (करडा) यांच्या संयुक्त विद्यमाने जवस पीक सुधारित लागवड तंत्रज्ञान प्रशिक्षण व समूह आद्यरेषा प्रात्यक्षिक तेलबिया पीक निविष्ठा वितरण कार्यक्रम निती आयोगाच्या आकांक्षीत जिल्हा वाशिम मधील तालुका रीसोड च्यां मौजे नेतन्सा गावात हनुमान मंदिर सभागृह येथे संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बिना नायर सहयोगी प्राध्यापक तथा जवस पैदासकार शास्त्रज्ञ AICRP जवस व मोहरी प्रकल्प कृषी महाविद्यालय नागपूर, प्रमुख अतिथी मार्गदर्शक म्हणून वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख कृषी विज्ञान केंद्र वाशिम डॉ. रवींद्र काळे तसेच तज्ञ मार्गदर्शक म्हणून श्री तुषार देशमुख कृषीविद्या तज्ञ व डॉ. स्वप्नील ठाकरे AICRP जवस व मोहरी प्रकल्प कृषी महाविद्यालय नागपूर, सौ सुरेखाताई बाजड अध्यक्ष पतंजली सेंद्रिय महिला बचत गट नेतांसा, प्रयोगशील शेतकरी श्री गजानन बाजड व श्री जयंत जोशी इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ बिना नायर मॅडम यांनी जवस पिकाचे मानवी आरोग्यासाठी मधुमेह हृदय रक्तदाब फफ संधिवात प्रतिकारशक्ती याबरोबरच महत्त्वाचे ओमेगा ३ अँटिऑक्सिडंट ,खाद्यतेल व औद्योगिक लिनन धागा उद्योग याकरिता असलेले महत्व सांगत अन्नप्रक्रिया आधारित उद्योगातील महत्त्व शेतकऱ्यांना सांगितले. तसेच शेतकऱ्यांनी विद्यापीठ निर्मित व प्रसारित तंत्रज्ञाने तेलबिया पिकांचे एकरी उत्पादन वाढवून अधिक आर्थिक नफा कमवावा आणि राष्ट्रीय पातळीवरील तेलबिया व तेलाची गरज पूर्ण करण्याकरिताता हातभार लावावा असे आवाहन केले. डॉ रवींद्र काळे यांनी शेतक-यांसाठी जिल्हा पातळीवरील कृषी विज्ञान केंद्राद्वारे केल्या जाणा-या विविध कार्याची माहिती दिली आणि स्वयंपूर्ण गावाच्या साठी शाश्वत शेती व्यवसाय आधारित उपक्रमांची गरज व महत्त्व शेतक-यांना सांगितले. कार्यक्रमात उपस्थित तज्ञ श्री तुषार देशमुख यांनी जवस पीक लागवड तंत्रज्ञान यामध्ये नवे सुधारित वाण एन.एल.२६०, एल.एस.एल.९३ यांची वैशिष्ट्ये व उत्पादन क्षमता सांगत, शेतक-यांना पेरणीपूर्व बीज प्रक्रिया व काळजी याबरोबरच खत व ओलित व्यवस्थापनाबद्दल मार्गदर्शन केले.डॉ स्वप्निल ठाकरे यांनी शेतक-यांना जवस पीक संरक्षण याबद्दल माहिती देताना तणे, कीड व रोगाची सखोल माहिती दिली. कार्यक्रमांमध्ये प्रतिनिधिक स्वरूपात प्रात्यक्षिकातील सहभागींना बियाणे निविष्ठा वितरित करण्यात आली. प्रयोगशील शेतकरी जयंत जोशी यांनी शेतक-यांसमवेत शेतीची गरज आणि संशोधन याबद्दल आपले मत व्यक्त करत कृषी विज्ञान केंद्र वाशिम व AICRP तेलबिया प्रकल्प नागपूर डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला यांच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले. कार्यक्रमात उपस्थितांचे आभार गजानन बाजड यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पिराजी जाधव, प्रवीण जाधव व जगदीश पर्बत तंत्र सहाय्यक यांनी अथक परिश्रम घेतले.

## रब्बी हंगामात करडी पिकाचे आधुनिक तंत्रज्ञान वापरातून वाढवा उत्पादन: डॉ. रवींद्र काळे



कृषी विज्ञान केंद्र वाशिम द्वारे जिल्ह्यातील प्रयोगशील शेतकऱ्यांसाठी २५ ऑक्टोबर २०२४ रोजी कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान तेलबिया पिके व कृषी तंत्रज्ञान प्रसार व संशोधन संस्था पुणे यांच्या सहकार्याने करडी पीक व्यवस्थापन आणि समुह आद्यरेशिय प्रात्यक्षिक निविष्ठा वितरण कार्यक्रमाचे प्रशिक्षण करडा येथे आयोजित केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. रवींद्र काळे प्रमुख वरिष्ठ शास्त्रज्ञ, सुविदे फाउंडेशन कृषी विज्ञान केंद्र वाशिम (करडा), तुषार देशमुख विषयतज्ञ कृषीविद्या तथा प्रभारी अधिकारी तेलबिया प्रात्यक्षिक कार्यक्रम हे मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाच्या परिचयात्मक भाषणात तुषार देशमुख यांनी स्वयंपूर्ण खाद्यतेलाच्या मागणीसाठी तेलबियांच्या पीक उत्पादनाचे महत्त्व आणि पीक तंत्रज्ञानातील प्रगतीद्वारे तेलबियांच्या उत्पादनात राष्ट्रीय खाद्यतेलब गरजेसाठी स्वयंपूर्णतेची आवश्यकता स्पष्ट केली. सुधारित करडी पिकाच्या तंत्र माहिती व प्रात्यक्षिक माध्यमातून तेलबियांचे उत्पादन वाढवण्यासाठी सुधारित वाण, आंतरपीक लागवड तंत्रज्ञान व प्रयोगशील शेतकरी केंद्रित महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले. डॉ. रवींद्र काळे यांनी चांगल्या शेतीसाठी प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहन त्यांनी शेतकऱ्यांना केले. मानवी आरोग्यसाठी आणि तेलबियांच्या मूल्यवर्धित उत्पादने प्रक्रियेतील करडी पिकाच्या फायद्यांविषयी सविस्तर माहिती दिली. सुधारित पीक उत्पादकता आणि प्रक्रिया तंत्रांवर प्रशिक्षण क्षमता वाढवून ग्रामीण कुटुंबांचे ग्रामीण भारतातून आधुनिक ग्रामीण भारतात रूपांतर करण्यासाठी कृषी संशोधन विस्तार प्रणालीत कृषी विज्ञान केंद्राचे महत्त्व अधोरेखित केले. गजानन बाजड यांनी ग्रामीण तेलबिया आणि खाद्यतेल उत्पादनात स्वयंपूर्णतेबाबत शेतकरी जागृतीसाठी वेळेवर केलेल्या प्रयत्नांसाठी कृषी विज्ञान केंद्र वाशिम तज्ज्ञ चमूची प्रशंसा केली. कार्यक्रमादरम्यान मान्यवरांच्या उपस्थितीत भारतीय तेलबिया अनुसंधान संस्थान हैदराबाद द्वारे प्रसारित करडी आय एस एफ ७६४ वाण प्रात्यक्षिक किटचे शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले.तेलबिया तंत्रज्ञान प्रतिनिधी पिराजी जाधव आणि प्रवीण जाधव यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विशेष प्रयत्न केले.

## जैविक निविष्ठा निर्मिती उत्पादन तंत्रज्ञान कौशल्य प्रशिक्षन

आत्मा पुरस्कृत, कृषि विज्ञान केंद्र वाशिम द्वारे आयोजन वनामती नागपुर व वाशिम आत्मा कार्यालय पुरस्कृत ग्रामिण युवकांना कौशल्य आधारीत प्रशिक्षण या योजनेअंतर्गत जैविक निविष्ठा निर्मिती उत्पादन तंत्रज्ञान या विषयावरील एक आठवडा कालावधीचे कौशल्य प्रशिक्षण कृषि विज्ञान केंद्र वाशिम द्वारे दिनांक ११ ते १७ डिसेंबर २०२४ या कालावधीत घेण्यात आले आहे. या प्रशिक्षणास कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.आर.एल.काळे यांच्या अध्यक्षेतेखाली तर नोडल अधिकारी विदाता वाशिम डॉ.एस.के.देशमुख व कृषि विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ टी.एस.देशमुख, आर.एस.डवरे, मयुर देशमुख, गृह विज्ञान शाखेच्या शुभांगी वाटाणे यांची प्रमुख उपस्थीती लाभली. पान ५ वर

## तूर पीक एकात्मिक व्यवस्थापन तंत्र प्रक्षेत्र भेट दिन कार्यक्रमाचे आयोजन




कृषी प्रोद्योगिकी अनुप्रयोग अनुसंधान संस्थान, पुणे (भा.कृ.अनु.प., नवी दिल्ली) आणि राष्ट्रीय अन्न-सुरक्षा अभियान (कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार) यांच्या विद्यमाने, तूर पीक उत्पादकता वाढविण्याच्या पद्धती/तंत्रज्ञानाधारित प्रात्यक्षिके अंतर्गत तूर पीक एकात्मिक व्यवस्थापन तंत्र प्रक्षेत्र भेट दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन कृषी विज्ञान केंद्र वाशीम द्वारे दिनांक ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी श्री. दत्तराव कुटे यांच्या शेतावर, पांघरी कुटे, ता. मालेगाव, जि. वाशीम येथे करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. शाकीर अली (शास्त्रज्ञ, कृषी तंत्रज्ञान प्रसार व अनुप्रयोग संस्थान, पुणे) होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. रवींद्र काळे (प्रमुख तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ, कृषी विज्ञान केंद्र, वाशीम) उपस्थित होते. कार्यक्रमास तूर पीक उत्पादक आणि प्रात्यक्षिक धारक शेतकरी देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित मान्यवर आणि तज्ञ मार्गदर्शकांनी तूर पिकाचे प्रात्यक्षिक पाहिले. या वेळी, डॉ. शाकीर अली आणि डॉ. रवींद्र काळे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत तूर पिकाच्या व्यवस्थापन तंत्राबद्दल सखोल माहिती दिली व शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. टी.एस. देशमुख (कृषीविद्या तज्ञ आणि सह अधिकारी, कडधान्य प्रात्यक्षिक, केव्हीके वाशीम) आणि कडधान्य सहायक श्री. गणेश देवकर यांनी अथक परिश्रम घेतले. श्री. दीपक कुटे यांनी तूर पिक प्रात्यक्षिकाचा अनुभव कथन करत, वाशीमच्या संपूर्ण टीमचे तंत्रज्ञानाच्या सहकार्यासाठी आभार मानले.

पान ४ वरून प्रशिक्षणादरम्यान डॉ.एस.के.देशमुख यांनी या प्रशिक्षणातून अवगत कौशल्य तंत्रज्ञान व त्यापासून शेती निविष्ठावर कमी होणारा खर्च उपस्थितांना स्पष्ट करून आधुनिक तंत्र वापरुन शेती व पूरक उद्योग वाढवावे आणि आर्थिक संपन्नता साधावी असे मत मांडले. कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.आर.एल.काळे यांनी जिवंत व सूक्ष्मजीव असलेल्या जमिनीचे फायदे सांगत विषमुक्त शेती काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. यापुढे बोलताना त्यांनी गोकृपा अमृत, जिवामृत, दशपर्णी अर्क, निम अर्क, गांडूळखत घरच्या घरी बनउन शेतीत वापर करावा तसेच गृह उद्योगातून पैसा यावा असे नियोजन साधावे व त्या अनुरूप मानसिकता बदलावी असे प्रतिपादन केले. या प्रसंगी कृविकेचे शास्त्रज्ञ टी.एस.देशमुख, आर.एस.डवरे, मयुर देशमुख, गृह विज्ञान शाखेच्या शुभांगी वाटाणे यांनी सुद्धा आपले विचार मांडले. तसेच मान्यवरांच्या हस्ते प्रशिक्षणार्थीणा प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. प्रक्षेत्रभेटी मध्ये सेंद्रिय व जैविक शेती डेमो यूनिट, जैविक कीड नियंत्रण प्रयोगशाळा, सोया प्रक्रिया यूनिट व माती परीक्षण प्रयोगशाळेची पाहणी करून तंत्रज्ञान समजून घेतले. प्रशिक्षणास वाशिम जिल्ह्यातील ग्रामिण युवक व युवती उपस्थित होते.



## कापूस उत्पादकता वाढीसाठी क्षेत्रीय वातावरणानुकूल तंत्रज्ञानाचा वापर: शेतीदिन




भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या मार्फत केंद्रीय कापूस पीक संशोधन संस्था, नागपूर आणि कृषी तंत्रज्ञान अनुप्रयोग अनुसंधान संस्थान, पुणे यांच्या सहकार्याने, कापूस पीक प्रकल्पाच्या अंतर्गत शेतावर उत्तम तंत्रज्ञानाचा उपयोग इतर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने कृषी विज्ञान केंद्र वाशिमने कापूस पीक शेतीदिनाचे आयोजन केले. हा कार्यक्रम दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी डोनद, तालुका कारंजा, जिल्हा वाशिम येथे संपन्न झाला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी विज्ञान केंद्र वाशिमचे प्रमुख डॉ. रवींद्र काळे होते, तर मार्गदर्शक म्हणून कृषीविद्या तज्ञ व कापूस पीक प्रकल्पाचे नोडल अधिकारी श्री टी. एस. देशमुख उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून श्री. देवेंद्र राऊत (संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, कारंजा), श्री. संतोष गुल्हाने, श्री. निरंजन करडे, व प्रयोगशील शेतकरी श्री. किशोर खराटे यांची उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषणात डॉ. रवींद्र काळे यांनी कृषी विज्ञान केंद्र वाशिमद्वारे राबविण्यात येणा-या कापूस पीक प्रकल्पाबाबत माहिती दिली. त्यांनी शेतक-यांना प्रसारित क्षेत्रीय वातावरणानुकूल तंत्रज्ञानाचा उपयोग करून कापसाचे उत्पादन वाढविण्याचा सल्ला देऊन शेतकऱ्यांनी शेती उद्योग म्हणून करण्याचें आव्हान केले. कृषीविद्या तज्ञ श्री. टी. एस. देशमुख यांनी शेतक-यांना कापूस पिकाच्या तांत्रिक पद्धती, स्वच्छ कापूस वेचणीच्या महत्वाबरोबरच कापूस पीक पश्चात शेडर यंत्राच्या वापराचे फायदे समजावून सांगितले. त्यांनी शेडर यंत्राचा उपयोग करून पिकाच्या कुट्टीद्वारे जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढविण्यावरही भर दिला. कार्यक्रमादरम्यान, प्रयोगशील शेतकरी श्री. किशोर खराटे यांच्या शेतावर भेट देऊन तज्ञांनी शेतक-यांना कापूस पिकाच्या अति घनता लागवड तंत्रज्ञानाची माहिती दिली. शेतकऱ्यांनी आपल्या अनुभवांचे कथन करत केव्हीके वाशिमच्या प्रयोग कार्याबद्दल समाधान व्यक्त केले. कार्यक्रमात उपस्थित शेतकऱ्यांनी शास्त्रज्ञांशी संवाद साधत विविध तांत्रिक शंका निरसन केले.

## मच्छीमार सहकारी संस्थांचे बळकटीकरण व गोड्या पाण्यातील मत्स्यसंवर्धन या विषयावर कार्यशाळा संपन्न

वाशिम: भारतीय कृषी संशोधन परिषद, नवी दिल्ली पुरस्कृत कृषी विज्ञान केंद्र, वाशिम आणि सहाय्यक आयुक्त मत्स्य विभाग, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने मच्छीमार सहकारी संस्थांचे बळकटीकरण व गोड्या पाण्यातील मत्स्यसंवर्धन या विषयावर कार्यशाळेचे आयोजन दिनांक १० डिसेंबर २०२४ रोजी विधाता प्रशिक्षण केंद्र, वाशिम येथे करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. प्रल्हादराव निगोट, माजी लेखापाल, मत्स्य सहकारी संघ, अकोला, उपस्थित होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मत्स्य सहकारी संस्थेचे अध्यक्ष श्री सुधाकर बोरकर व श्री सुरेशभाऊ थोटे मंचावर उपस्थित होते. कार्यशाळेच्या सुरुवातीला कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर. एल. काळे यांनी स्वागतपर भाषण केले. त्यांनी मत्स्य व्यवसायातील आधुनिक तंत्रज्ञान व सहकारी संस्थांच्या कार्यक्षमता वाढविण्यासाठी उपाययोजनांवर प्रकाश टाकला. पान ६ वर

## सुक्ष्म अन्नप्रक्रिया व उद्योजकता विकास या विषयावरील जिल्हास्तरीय प्रशिक्षण



आत्मनिर्भर भारत मोहिमेअंतर्गत केंद्र शासनाच्या महत्वकांशी प्रधान मंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया उघोग योजना लाभर्थ्यांची तीन दिवसीय सुक्ष्म अन्नप्रक्रिया व उदयोजकता विकास प्रशिक्षण दिनांक २७ते २९ नोव्हेंबर २०२४ दरम्यान विदाता प्रशिक्षण केंद्र वाशिम या ठिकाणी संपन्न झाले. या प्रशिक्षनादरम्यान डॉ. एस.के.देशमुख यांनी प्रधान मंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया योजनेचे घटक, लाभार्थी, अर्ज करण्याची पदधती व आर्थिक मापदंड समजावुन सांगितले. सध्या जिल्हयात अस्तीत्वात असलेल्या अन्न प्रक्रिया उदयोगाचा विस्तार वाढविण्यासाठी आणि नविन उदयोग सुरु करण्यासाठी पाठबळ पुरविने या साठी केंद्र शासनाने हि योजना राज्यभर लागु केले असे सांगितले. क्षमता बांधनी व उदयमशिलतासाठी कौशल्य आधारीत प्रशिक्षण सहभागी होवुन लाभ घ्यावा असे आव्हान केले. तसेच या योजनेचा लाभ घेवून यशस्वी उद्योजकांना राज्य स्तरावर सन्मानाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विज्ञान केंद्र प्रयत्नशील राहील असे आश्वासन दिले कृषी विज्ञान केंद्राचे गृह विज्ञान केंद्राच्या प्रमुख तज्ञ प्रशिक्षक व समन्वयक शुभांगी वाटाने यांनी प्रशिक्षणाची रुपरेषा अवगत करुन मुल्य साखळी तसेच मार्केटिंग व ब्रँडिंग करीता विशेष भर देवुन यशस्वी उदयोजक घडविण्यासाठी प्रशिक्षणाची मांडनी केली असल्याचे सांगितले. महिलांनी गृहउदयोग जसे की पापड उदयोग, सोयाबीन प्रक्रिया उदयोग, काजु प्रक्रिया उदयोगामध्ये अग्रेसर होवुन उदयोग निर्मिती करावे असे सांगितले.यांनी नैसर्गीक रित्या पिकविलेल्या शेतमालावर प्रक्रिया करून सेंद्रिय अन्न पदार्थ तयार केल्यास आज शहरी भागात त्याला चांगली बाजारपेठ मिळून भाव ही चांगला मिळू शकतो हे पटवून दिले जिल्हा संसाधन व्यक्ती गोपाल मुठाळ यांनी जिल्हयात सुरु असलेल्या उदयोग तसेच नविन सुक्ष्म अन्नप्रक्रिया उदयोग यांचे अर्थशास्त्रीय विश्लेषण करुन योजनेतील बिज भांडवल, वयक्तीक व गट प्रक्रिया उदयोग व शाश्वत व्यवसाय आराखडा कसा असावा या विषयी सुदधा मार्गदर्शन केले. तर ईडीपी प्रशिक्षक अर्चना कदम यांनी उद्योजकांच्या अंगी चिकाटी नाविन्यता जिद्द इत्यादि सारखे गुण असणे आवश्यक आहे असे सांगून त्यांनी अन्नप्रक्रिया उद्योगासाठी लागणार्याब मशीनरी व त्यांची देखभाल या विषयी मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणादरम्यान मंगरूळपीर तालुक्यातील मानोली येथील प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेच लाभ घेतलेले श्री विशाल महुलकर यांच्या व्यंकटेशय ऑईल मिल प्रक्रिया युनिट ल भेट देवुन त्याची कार्यप्रणाली समजून घेतली कार्यक्रमास जिल्हयातील महिला उदयोजक व शेतकरी मोठया संख्येने उपस्थीती लाभली. कार्यक्रमाचे सुत्र संचालन गंगाधर काळे व आभार प्रदर्शन अभिषेक देशमुख यांनी केले

## मिलियनेयर फार्मर ऑफ इंडिया अवार्ड २०२४ ने डॉ.हेमंत देशमुख सन्मानीत



महाराष्ट्र शासनाच्या वसंतराव नाईक शेतीनिष्ठ पुरस्कार विजेते मालेगाव तालुक्यातील डोंगरकिन्ही येथिल नाविन्यपूर्ण प्रयोगशील शेतकरी डॉ.हेमंत वसंतराव देशमुख यांना दिल्ली स्थित भारतीय कृषि अनुसंधान संस्थेत दिनांक २ डिसेंबर २०२४ रोजी मिलियनेयर फार्मर ऑफ इंडिया अवार्ड २०२४ करिता कार्यक्रमाचे आयोजक कृषि जागरणचे प्रमुख एम.सी.डॉमिनिक व भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे सहायक महासंचालक डॉ.बर्मन यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देऊन सन्मानीत करण्यात आले. या प्रसंगी केंद्रीय कृषी राज्यमंत्री भगीरथी चौधरी तथा भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे शास्त्रज्ञ उपस्थित होते. डॉ. हेमंत देशमुख यांच्याकडे ३५ एकर शेती असून त्यावर त्यांनी इस्त्रायल पद्धतीचे खत व पाणी देण्याचे व्यवस्थापन करणा-या ऑटोमिशन युनिट ची स्थापना केली. अशा प्रकारचे युनिट स्थापन करणारे ते वाशिम जिल्ह्यातील प्रथम शेतकरी आहेत. कृषि विज्ञान केंद्र वाशिम यांचे संपर्क शेतकरी डॉ.हेमंत वसंतराव देशमुख यांचे नामांकन भारतीय कृषि अनुसंधान परिषदेकडे मिलियनेयर फार्मर ऑफ इंडिया अवार्ड २०२४ करिता सादर केले होते. त्याकरिता त्यांनी कृषि विज्ञान केद्र वाशिमचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ.आर.एल.काळे व कृवि.के.च्या शास्त्रज्ञाचे आभार मानले.

पान ५ वरून प्रियंका झोड यांनी मत्स्य व्यवसायाच्या आर्थिक व सामाजिक फायदे उलगडून सांगितले. त्यांनी गोड्या पाण्यातील मत्स्यपालन, जलस्रोतांचे व्यवस्थापन, मत्स्य उत्पादन वाढवण्यासाठी उपयोगी उपाय, तसेच मत्स्य उत्पादकांचे आर्थिक बळकटीकरण यासाठी शासकीय योजनांबद्दल माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात श्री प्रल्हादराव निंगोट यांनी मागील ३५ वर्षांमध्ये मत्स्य व्यवसायात झालेल्या बदलांवर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी मत्स्य व्यवसायाच्या प्रगतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे काळाची गरज असल्याचे नमूद केले. श्री सुरेश भाऊ थोटे व श्री सुधाकर बोरकर यांनी मत्स्य व्यवसायातील आधुनिक तंत्रज्ञान, सहकारी संस्थांचे व्यवस्थापन, मत्स्य उत्पादकता वाढवण्यासाठी विविध पद्धती, तसेच मत्स्य पालनातील अडचणी आणि त्यावर उपाय यावर सखोल चर्चा केली. कार्यशाळेत वाशिम जिल्ह्यातील विविध मच्छीमार सहकारी संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. उपस्थित सदस्यांनी मत्स्य व्यवसाय क्षेत्रातील अडचणींवर चर्चा केली आणि त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी मार्गदर्शन मिळवले.



## नैसर्गिक शेती पद्धती द्वारे हळद पीक लागवड तंत्रज्ञान व पिक पाहणी कार्यक्रम

भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली पुरस्कृत कृषी विज्ञान केंद्र अंतर्गत उद्यान विद्या विभागा द्वारे नैसर्गिक सेंद्रिय शेतीचा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणात करण्यात येत असून याच उद्देशाने मौजे मोरगव्हाण, तालुका रिसोड, जिल्हा वाशिम येथील प्रगतिशील शेतकरी श्री शंकरराव कोकाटे यांच्या शेतातील हळद पीक प्रात्यक्षिक पाहणी कार्यक्रम व तांत्रिक चर्चा सत्राचे आयोजन उद्यानविद्या विभाग कृषी विज्ञान केंद्र वाशिम यांच्या वतीने दिनांक ४ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र काळे यांची तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून निवृत्ती पाटील उद्यान विद्या तज्ञ केव्हीके, वाशिम यांची उपस्थिती होती. प्रमुख उपस्थितीत प्रगतिशील शेतकरी शंकर कोकाटे, गोविंद देशमुख, डॉ. गजानन ढवळे, तेजराव खडसे, मोबीन शहा, संतोष ठाकूर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात उपस्थित सर्व शेतकरी बंधूंनी व भगिनींनी शास्त्रज्ञांच्या सोबत नैसर्गिक आणि रासायनिक अशा दोन्हीही हळदीच्या पिकाची पाहणी करून निरीक्षणे घेण्यात आली. यादरम्यान प्रात्यक्षिक धारक शेतकरी शंकर कोकाटे यांनी रासायनिक आणि नैसर्गिक अशा दोन्हीही प्लॉटमध्ये केलेल्या उपाययोजनाबद्दल विशेषता गोकृपा अमृत द्वारे नैसर्गिक शेती पद्धती मध्ये अत्यंत कमी खर्चात व कुठलेही रसायनिक निविष्ठा न वापरता हळद पीक हे अत्यंत गुणवत्तापूर्वक व फ्फुटव्यांची संख्या आणि कंदांचा आकार व वजन हे रासायनिक प्लॉटच्या तुलनेत अधिक चांगले दिसून येत असल्याचे सांगितले व प्रत्यक्षात दाखविले सुद्धा. तांत्रिक सत्रात निवृत्ती पाटील यांनी नैसर्गिक शेती पद्धती ही काळाची गरज असून गोकृपा अमृत द्वारे अत्यंत सोप्या व सहज पद्धतीने रासायनिकच्या तुलनेत अधिक उत्पादन घेणे सहज शक्य असल्याचे सांगितले आणि या पद्धतीबद्दल सविस्तरपणे तांत्रिक माहिती देऊन उपस्थित शेतकऱ्यांनी रब्बी हंगामातील कांदा बीज उत्पादन, गहू, हरभरा, चीया इत्यादी पिकांमध्ये या पद्धतीचा अवलंब कसा करावा याबद्दल मार्गदर्शन केले. अनुभव कथन करताना गोविंद देशमुख यांनी या पद्धतीद्वारे शेतीचा मागील चार वर्षांचा अनुभव विशद करत त्यांच्या उत्पादनात व उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्याचे सांगितले आहे. यासोबतच करडा येथील गोमाता महिला सेंद्रिय शेती गटाच्या महिला सदस्यांनी आपल्या आपल्या हळद, सोयाबीन, उडीद, कपाशी, तूर इत्यादी पिकांबद्दल गोकृपा अमृत आधारित नैसर्गिक शेती पद्धतीचा अनुभव मांडला आणि या पद्धतीद्वारे त्यांच्या उत्पादनात किमान दीडपट उत्पादन वाढल्याचे सांगितले. अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ. रवींद्र काळे यांनी शाश्वत उत्पादनाकरिता गोआधारित शेती पद्धती हा एक उत्तम पर्याय असून अधिकाधिक शेतकरी व युवकांनी या तंत्रज्ञानाचा अवलंब करावा व शेतीमध्ये होणाऱ्या अनाठायी खर्चावर नियंत्रण करून उत्पादन वाढीसोबतच जमिनीचे आरोग्य जोपासावे असे आवाहन केले. सदर कार्यक्रमात वाशिम जिल्ह्यातील असंख्य शेतकऱ्यांनी व महिलांनी सक्रिय सहभाग नोंदविला





## कृषि विज्ञान केंद्रा व्दारे जागतिक मृदा दिवस साजरा




शाश्वत भविष्य व अन्न सुरक्षतेसाठी मातीचे आरोग्य बाबत शेतक-यांमध्ये जागरुकता निर्माण व्हावी या हेतुने दरवर्षी ५ डिसेंबर या दिवशी जागतिक मृदा दिन म्हणुन साजरा केला जातो. सन २०२४ च्या मृदा दिनाचे घोष वाक्य मातीची काळजी: मोजा, पाहणी करा, व्यवस्थापीत करा हे आहे. कृषि विज्ञान केंद्र, वाशिम व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कृषि विभाग वाशिम यांच्या संयुक्त विघमाने कार्यक्रमाचे आयोजन निती आयोगाच्या अकांक्षित मालेगाव तालुक्यातील मौजे एकंबा या गावातील सिद्धेश्वर मंदिर येथे घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावच्या सरपंच सौ. मालता अनिल कांबळे तर विशेष अतिथी मध्ये वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ.आर.एल.काळे, मिलीयेनेयर पुरस्कार विजेते डॉ.हेमंत देशमुख, जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी अधिकारी वाशीम विजय ढवळे, पोलिस पाटील रमेश माधवराव गवळी, प्रगतशील शेतकरी देवराव गवळी, स्वीचओंन प्रतिष्ठानचे नितीन भालेराव आदी मान्यवर मंचावर विराजमान होते. स्वागतानंतर प्रास्तावनेत डॉ.एस.के.देशमुख यांनी मृदा दिनाचे महत्व विषद करुन उत्तम जमिन आरोग्यासाठी माती परीक्षण बाबत मार्गदर्शन केले. यापुढे बोलतांना त्यांनी हवामान बदलामुळे परिणाम करणारे घटक तापमान वाढ, कमी पाऊस मान, शेंद्रीय घटक जाळणे इत्यादी परिस्थितीत सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढवुन जमिनीचे आरोग्य अबाधित राखावे असे आव्हान केले. डॉ.आर.एल.काळे यांनी कृषि विज्ञान केंद्राने नैसर्गिक व सेंद्रिय शेतीचा प्रचार व प्रसिद्धी साठी राबवीत असलेल्या उपक्रमांची विस्तृत माहिती देऊन शेतक्यांनी सेंद्रिय निविष्ठा उत्पादन तंत्र अवगत करून कृषि निविष्ठावरील खर्च कमी करावा व एकात्मिक शेती पद्धती स्विकारावी असे आव्हान केले. कृषि विघातज्ञ टी.एस.देशमुख यांनी शाश्वत उत्पादनासाठी जमीन आरोग्य व्यवस्थापन व एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन तंत्राचे सविस्तर सादरीकरण करत शेतक-यांनी कृषि परिषद तसेच कृषि विद्यापीठाद्वारे सेंद्रिय शेती पद्धतीच्या शिफ्फारशी नुसार व्यवसायिक पिके व फ्फळझाडाचे उत्पादन घेवून निर्याती पर्यंत पुढे जावे असे आग्रही भूमिका मांडली. कार्यक्रमादरम्यान डॉ.हेमंत देशमुख यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी बोलतांना त्यांनी अनुभवातून व्यवसायिक शेतीकडे वळल्याचे सांगून शेतक-यांनी जमिनीची काळजी घ्यावी व पाण्याचे नियोजन करावे असे आव्हान केले. जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी अधिकारी वाशीम विजय ढवळे यांनी परंपरागत कृषि विकास योजनेची माहिती देऊन जमीन आरोग्य संकल्पना व शाश्वत जमिनीसाठी उपाययोजना या विषयी प्रबोधन केले. कार्यक्रमादरम्यान मान्यवरांच्या हस्ते प्रतिनिधीक स्वरुपात शेतक-यांना मृदा आरोग्य पत्रिका वाटप तसेच मृदा आरोग्य पत्रिकेचे वाचन करण्यात आले तसेच सेंद्रिय शेती उत्पादक कैलास रामराव गवळी, विश्वास रामराव गवळी यांच्या शेतातील चिया, हळद, गहू व तूर पिकाची शास्त्रज्ञांनी भेट देऊन पाहणी केली. कार्यक्रमास कृषी सहायक अमोल नवघरे, गणेश ठोकळ, रुस्तम सोनोने उपस्थित होते. कार्यक्रमास शेतकरी बांधव, बचत गटातील महिला, शिवसूत्र जैविक फार्मर उत्पादक कंपनी सदस्य तसेच तालुक्यात स्थापित शेतकरी उत्पादक कंपनीचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कृषी विज्ञान केंद्र सलग्न प्रकल्पातील शिवाजी वाघ, अविनाश गवळी, दत्ता काळे व गणेश देवकर यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.एस.के.देशमुख यांनी तर आभार गंगाधर काळे यांनी आभार मानले.

## कापूस पिक शेतीदिनः अतिघन लागवड व पऱ्हाटी-कुट्टी शेतीतंत्रफायदेशीर

भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या अंतर्गत केंद्रीय कापूस पीक संशोधन संस्था, नागपूर आणि कृषी तंत्रज्ञान अनुप्रयोग अनुसंधान संस्थान, पुणे यांच्या सहकार्याने, विशेष कापूस प्रकल्पाच्या अंतर्गत शेतकऱ्यांपर्यंत प्रगत तंत्रज्ञान पोहोचविण्याच्या उद्देशाने कृषी विज्ञान केंद्र, वाशिमने कापूस पिक शेतीदिनाचे आयोजन केले. कार्यक्रम ६ डिसेंबर २०२४ रोजी अमनवाडी, तालुका मालेगाव, जिल्हा वाशिम येथे डॉ. रवींद्र काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी संशोधन केंद्र, वाशिमचे प्रमुख डॉ. भारत गिते होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सुधीर देशमुख (सुविदे फाउंडेशन, वाशिम), श्री. राजेश डवरे (पीक संरक्षण तज्ञ, रिसोड), श्री. तुषार देशमुख (कृषीविद्या तज्ञ आणि प्रकल्प नोडल अधिकारी), श्री. महादेव डाखोरे (तलाठी, अमनवाडी), आणि इतर मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविकात श्री. तुषार देशमुख यांनी प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत माहिती देत कापूस पिकाच्या तंत्रज्ञानाचा शेतकऱ्यांना होणारा लाभ समजावला. त्यांनी कृषी विज्ञान केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या शेतकरी केंद्रित उपक्रमांचे महत्त्व विशद केले. डॉ. भारत गिते यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात शेतकऱ्यांना कापूस, तूर, गहू, हरभरा यांसारख्या पिकांसाठी योग्य नियोजन करण्याचा सल्ला दिला. तसेच, कृषी विज्ञान केंद्र वाशिमच्या कापूस प्रकल्प आणि शेती विस्तार कार्याबद्दल कौतुक व्यक्त केले. डॉ. सुधीर देशमुख यांनी स्थानिक वातावरणाशी सुसंगत तंत्रज्ञानाचा वापर करून कापसाचे उत्पादन वाढविण्याचे आवाहन केले. राजेश डवरे यांनी रासायनिक कीटकनाशकांवरील खर्च कमी करण्यासाठी एकात्मिक कीडरोग व्यवस्थापनावर भर दिला. श्री. तुषार देशमुख यांनी कापूस पिकाच्या अति-घनता लागवड तंत्रज्ञानाचे फायदे, स्वच्छ वेचणीचे महत्त्व, आणि शेडर यंत्राद्वारे पिकाच्या कुट्टीचा उपयोग करून जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढवण्याचे तंत्रज्ञान समजावून सांगितले. कार्यक्रमादरम्यान, शेतकरी श्री. परसाराम भालेराव यांच्या शेतावर भेट देण्यात आली. तिथे तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना अति-घनता लागवडतंत्रज्ञानाची माहिती दिली. श्री. भालेराव यांनी केव्हीके वाशिमच्या मार्गदर्शनामुळे झालेल्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. कार्यक्रमात शेतकऱ्यांनी शास्त्रज्ञांशी संवाद साधत तांत्रिक शंकांचे निरसन केले. मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित राहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. प्रवीण जाधव यांनी केले, तर श्री. शिवाजी वाघ यांनी आभार मानले. अतिघन लागवड व पऱ्हाटी-कुट्टी शेतीतंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होण्याबरोबरच शेती अधिक शाश्वत होईल, यावर कार्यक्रमात भर देण्यात आला.

## शेतीदिन- शेतीतील सुपीकता व गुलाबी बोंडअळी व्यवस्थापन गरजेचे

कृषी विज्ञान केंद्र वाशिम व केंद्रीय कापूस संशोधन संस्था नागपूर द्वारे विशेष कापूस प्रकल्प अंतर्गत कापुस पीक शेतीदिनाचे दि.७ डिसेंबर २०२४ रोजी मौजे ग्रामपंचायत विळेगांव तालुका कारंजा जिल्हा वाशिम येथे आयोजन करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ.आर. एल.काळे,अतिथी म्हणून श्री माणीकराव घुले माजी सरपंच, प्रयोगशिल शेतकरी तुकाराम घुले , समुदाय संसाधनव्यक्ती सौ. सुचिता गाढवे तर मार्गदर्शक म्हणून नोडल अधिकारी विशेष कापूस प्रकल्प टी एसब देशमुख इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात टी. एस. देशमुख यांनी शेतकऱ्यांना सघन कापुस पीक लागवड तंत्रज्ञान सुलभ सुधारित वाण, प्रकल्पाचे उद्देश व फायदे सांगत कपाशी पीक स्वच्छ कापुस वेचणी काळजी व पीक कापणी पश्चात श्रेडर यंत्र वापरद्वारे एकरी २ टन पऱ्हाटी काड जमिनीत गाडून – मृदा सेंद्रियकर्ब निर्मितीतून सुपीकता वाढ करून जमिनीत २० किलो नत्र २ किलोस्फुरद १२ किलो पालाश प्रति एकर निर्मिती व गुलाबी बोंडअळी चक्र खंडित करावे असे सांगितले. डॉ. आर. एल. काळे यांनी शेतकऱ्यांनी आजच्या बदलत्या हवामानातील आव्हानांचा सामना करण्यासाठी वातावरणाशी सुसंगत पीकतंत्र अवलंबणे आवश्यक आहे. त्यांनी शेतमालाची प्रक्रिया करून त्याला अधिक मूल्यवर्धन देण्याचे महत्त्व पटवून दिले, जेणेकरून उत्पन्नात लक्षणीय वाढ होईल. शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सामूहिक प्रयत्नांद्वारे अधिक उत्पादन व टिकावू शेतीचा मार्ग शोधावा, असा संदेश त्यांनी दिला. कार्यक्रमादरम्यान प्रकल्पातील प्रात्यक्षिक धारक शेतकरी श्री संजय घुले यांचें शेती पाहणी करण्यात आली. यावेळी शेतकरी यांनी विचारलेल्या प्रश्नांचे तज्ज्ञांनी समाधान केले. उपस्थित शेतकरी यांनी सघन पीक लागवड तंत्रज्ञानाबाबत समाधान व्यक्त केले.



**कृषी विज्ञान केंद्र, ई-त्रैमासीक बातमीपत्र**

डॉ.आर.एल.काळे (प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ) कृ.वि.के.करडा ता.रिसोड जि.वाशिम दुरध्वनी क्र.०७५१-२२६५१३ फॅक्स - ०७५१-२२२४६२ यांनी रिसोड येथे मुद्रीत करून करडा येथे प्रसिध्द केले.

wabsite - www.kvkwashim.com/emil-kvk.washim@yahoo.com

**मुख्य संपादक**
**डॉ.आर.एल.काळे**
(वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख)

**संपादक मंडळ**
डॉ.आर.एल.काळे (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख), डॉ.एस.के.देशमुख (विस्तार शिक्षण)
श्री आर.एस.डवरे (पीक संरक्षक), श्री एन.बी.पाटील (उद्यान विद्या)
श्री टि.एस.देशमुख (कृषि विद्या), डॉ.डी.एन.इंगोले (कृषि अर्थशास्त्र)
श्री एम.एस. देशमुख (पशुविज्ञान), श्री एस.आर.बावस्कर (संगणक शास्त्र),
सौ.एस.एन.वाटाणे (गृह विज्ञान), श्री प्रमोद देशमुख (प्रक्षेत्र व्यवस्थापक),

मुद्रक : जिजाऊ ग्राफिक्स,रिसोड मो.९६७३१५६०९५